# बापूचा आशीर्वाद



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा
दा. क्र. १२८७८

IRBK-0112748

रत्नभारती प्रकाशन

१२७४८

७६६०३
30/3/०
३६५८

# बापूंचा आशीर्वाद

मूळ इंग्रजी लेखन:
**स्वर्ण खंडपूर**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७६६०३ दि बा.वा...
क्रमांक... ३६५८ नोंद दि...30/3/07

अनुवाद :
**शेष नामले**

**चित्रालेखन : कलाविभाग, रत्नभारती**



गांधीजींच्या मूळ लेखनाच्या आधारे.
सौजन्य: दी नवजीवन ट्रस्ट

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ...१२५७८ नों. दि .........
वि. ....०११११ क्र. ...............

मूल्य रु. १.७५

© रत्नभारती १९६९

**रत्नभारती**
इलेको हाऊस, सर फेरोजशाह मेहता मार्ग, मुंबई–१ बी आर

IRBK-0112748



लहानशा पक्ष्यांनो,

पक्ष्यांना सामान्यतः पंखांशिवाय उडता येत नाही. पंख असतील, तर कोणीही उडू शकेल, पण ते नसूनही तुम्ही उडू शकलात तर? तर तुम्हाला कोणतीही गोष्ट कठीण वाटणार नाही. तुम्हाला तेच मी आज दाखविणार आहे.

बघा, मला कुठे आहेत पंख? तरी दररोज मी विचाराने उडत उडत तुमच्या पर्यंत पोहोचतो. तुम्ही पण असे विचाराने उडत उडत मला भेटू शकता.



ज्यांना स्वतःला विचार करता येतो त्यांना शिकवायला कोणी शिक्षक लागत नाही. शिक्षक आपले मार्गदर्शन करू शकतात. ते आपल्याला विचार करण्याची शक्ती देऊ शकत नाहीत. ती आपल्या जवळच गुप्त स्वरूपात असते. जी मुले शहाणी असतात त्यांना चांगले विचार सुचतात.

तुमच्या सर्वांच्या सह्यांचे मला पत्र पाठवा. ज्यांना सही करता येत नसेल, त्यांनी नुसती फुली केली तरी चालेल.

तुमचा
बापू



हे बापू कोण आहेत ? त्यांनी कोणाला असे पत्र लिहिले आहे ? त्यांनी हे पत्र पक्ष्यांना नक्कीच लिहिलेले नाही. ओळखलत ना तुम्ही ?

बापूजींचे खरे आणि पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी होते. मुले त्यांना प्रेमाने 'बापूजी' म्हणत. बापूजी म्हणजे पिताजी. अेखाद्या पित्याने आपल्या मुलांवर प्रेम करावे त्याहि-पेक्षा अधिक प्रेम बापूजी सर्व मुलांवर करीत. मित्राप्रमाणे ते मुलांना सल्ला देत, शिक्षकाप्रमाणे ते शिकवीत आणि त्यांचे डॉक्टर बनून त्यांना औषधे पण देत. वेळ मिळाला म्हणजे बापूजी त्यांच्याशी खेळत आणि त्यांना गोष्टी पण सांगत. काही वेळा त्यांच्या बरोबर ते पोहत असत; त्यांना नेहमी पत्रे लिहीत आणि अशा रीतीने ते मुलांशी निकटचा संबंध ठेवीत. मुलांना विचार करण्याची सवय लागावी असे बापूजींना वाटत असे.

मुले जन्मत: निर्दोष, सरळ आणि प्रेमळ असतात यावर बापूजी विश्वास ठेवीत.

दुसऱ्या एका पत्रात आपल्या छोटया मित्रांना बापूजींनी असा उपदेश केला आहे—"कमी बोला, प्रत्येकाचे ऐका आणि सत्याचीच कास धरा, गरीबासारखे रहा आणि श्रीमंतीचा कधीच अभिमान बाळगू नका. प्रत्येक मिनिटाचा हिशोब ठेवा आणि जेव्हाचे काम तेव्हाच करा. नियमाने दररोज व्यायाम घेत जा. . . . . . ."

बापूजींचे जीवन म्हणजे कसे जगावे याचा एक आदर्श पाठ होता. ते दुसऱ्यांना जे शिकवीत, ते आधी स्वत: आचरणात





आणीत. बापूजी दहा वर्षांचे असताना त्यांनी एका मित्राला आपल्या घरी जेवायला बोलावले. जेवायचे सर्व वाढून झाले, सर्व मंडळी पानांवर बसली आणि जेवू लागली. कोणाचेच लक्ष न राहिल्याने बापूजींचा मित्र तसाच राहून गेला. बापूजींना स्वतःच्या या निष्काळजीपणाची आणि अविवेकी वर्तनाची इतकी लाज वाटली, की याबद्दल त्यांनी स्वतःला शिक्षा करायचे ठरविले. त्या दिवशी आमरसाचे जेवण होते. त्या आंब्याच्या मोसमात त्यानी आमरस न खाण्याचे ठरविले व तसे निश्चयाने केले.

काटकसर, वक्तशीरपणा, सहृदयता, अहिंसा आणि स्वच्छता [illegible] बापूजींना अतिशय प्रिय होते. पण [illegible]

त्यांचे सत्यावर अधिक प्रेम होते. बापूजी लहान होते तेव्हा त्यांनी एकदा 'राजा हरिश्चंद्र' हे नाटक पाहिले. राजा हरिश्चंद्राची गोष्ट तुम्ही पण ऐकली असेल. तो सत्यवचनी राजा होता. सत्यासाठी कोणताही त्याग करावा लागला तरी तो करीत असे. सत्यासाठी त्याने आपले राज्य घालविले, पत्नी आणि मुलाला विकून टाकले. ह्या नाटकाचा बापूजींच्या बाल-मनावर फार प्रभाव पडला. या नाटकाचा खेळ ते घरात स्वतःशी पुनः पुनः खेळत. हरिश्चंद्रासारखे सर्वांनीच सत्यप्रेमी का बनू नये, असा प्रश्न ते रात्रंदिवस स्वतःला विचारीत. सत्याविषयीच्या या आदर्शाचा त्यांच्या मनावर येवढा प्रभाव पडला की पुढील जीवनात सत्य हेच त्यांचे दैवत बनले.

कोणाबद्दलही वाईट बोलू नये, वाईट पाहू नये आणि वाईट ऐकू नये, हें सुचविणाऱ्या तीन माकडांच्या शहाणपणावर बापूजींचा दृढ विश्वास होता. प्रत्येकाने आपल्या विचारात, वाणीत आणि कृतीत सत्यप्रेमी बनले पाहिजे असे बापूजींना



वाटत असे. आपल्या छोटया मित्रांनी प्रामाणिक बनण्याचा, तसेच स्वत:शी व दुसऱ्याशी सत्यनिष्ठ राहाण्याचा प्रयत्न केला, म्हणजे बापूजींना आनंद होत असे.

एकदा असेच बापूजी मुलांशी बोलत होते. ते म्हणाले, 'अमुक अमुक मनुष्य चांगला आहे हे कदाचित तुम्हाला कळत असेल, नाही' ?

'हो ! हो ! !' मुले उत्तरली.

'पण एकाला तुम्ही चांगले म्हणालात, मग बाकीच्या माणसांना तुम्ही काय म्हणणार ? '

'बापूजी, सर्व माणसे चांगली असतात.'

'तुमच्याशिवायची सर्व ना' ?

'नाही, नाही, आम्ही पण चांगली आहोत.'

'तुमच्यात एकही अपवाद नाही ? खात्रीने अगदी' ?

'हो, बापूजी'

'बर तर सांगा पाहू तुमच्यापैकी कोण कोण खोट बोलत ?

काही मुले म्हणाली--

'आम्ही खोटे बोलतो,'

'नेहमी की कधी कधी ? '

'कधी कधी'

'आणि भांडण पण करीत असता ना ?'

'हो बापूजी'

'नेहमी, की कधी कधी ? '

'नेहमी.' म्हटल्याबरोबर सर्वांचा अेकच हशा पिकला.



‘बर, तुम्ही चांगली मुले आहात हे मी पण म्हणेन. कारण तुम्ही कधी कधी खोट बोलता आणि आपापसात नेहमी भांडता हे कबूल केले आहे. पण जे दुसऱ्यांनी खर बोलाव म्हणून सांगतात पण स्वत: मात्र कधीच खरे बोलत नाहीत त्यांना काय म्हणाव ? ’

‘त्यांना ढोंगी म्हणाव, बापूजी.’

‘अगदी बरोबर. आपण कधीही ढोंगी बनता कामा नये.’

लोकांचे दारिद्रय आणि दुर्दशा यामुळे बापूजींना फार दु:ख होत असे. त्यांची स्थिती सुधारण्यासाठी ते नेहमी प्रयत्न करीत. लोकांना स्वच्छ आणि साध्या राहाणीचे महत्व ते सांगत असत. स्वत:पुरती खादी तयार करता यावी म्हणून ते त्यांना कताई आणि विणकाम पण शिकवीत असत.

बापूजी स्वत: गरिबांसारखा पोशाख करीत. ते स्वत: खादीचा पंचा वापरीत आणि चपला घालीत. राजे, राजकारणी लोक आणि सामान्य माणसे यांना ते याच पोषाखात भेटत.

बापूजी नेहमी रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाने प्रवास करीत. ते हरिजन वस्तीत रहात. त्यांचा आहार फार साधा असे. जरुर पडल्यास, ते रस्ता अथवा शौचकूप स्वच्छ करणे यांसारखी अत्यंत हलकी समजली जाणारी कामे करायलाही तयार असत.

बापूजी शांततेचे चाहते होते. लोकांना प्रेमाने आणि दयेनेच जिंकणे शक्य आहे, हिंसाचार आणि द्वेषाने त्यांना जिंकता येत नाही, यावर बापूजींचा पूर्ण विश्वास होता. याबरोबरच त्यांना अन्याय सहन होत नसे. अन्यायाशी सामना करण्यासाठी आणि जुलमी कायद्यांचा प्रतिकार करण्यासाठी बापूजींनी सत्याग्रह' (अन्यायाचा अहिंसात्मक प्रतिकार) सुरु केला. हिंसेला आणि अन्यायाला शांतपणे कसे तोंड द्यावे हे त्यांनी लोकांना शिकविले. त्यांच्या अहिंसक सैन्यात वृध्द पुरुष, स्त्रिया आणि मुलांनाही स्थान मिळत असे.

ब्रिटीश सरकार अन्यायी कायदे करून लोकांना त्रास देत असल्याचे बापूजींनी पाहिले. सरकारने केलेला मिठाचा कायदा असाच होता. समुद्राच्या पाण्यापासून सहज बनविता



येणारे मीठ सरकारशिवाय कोणालाही तयार करू देण्यात येत नसे. मीठ हा असा पदार्थ आहे की ज्याच्या वाचून कोणाचे चालू शकत नाही. म्हणून बापूजी आपल्या अनुयायांसह दांडीला (समुद्रकाठी वसलेले एक लहानसे खेडे) मीठ तयार करण्यासाठी कूच करीत गेले. भारतातील हजारो लोकांनी मीठ बनवायला सुरुवात केली. सरकारने लोकांची धरपकड सुरू केली. पोलिसांनी लोकांना दंडुक्यांचा मार देऊन पाशवी बळ वापरले, तरी लोक मात्र शांत राहिले. त्यांनी निषेध व्यक्त करण्यासाठी आपला हातदेखील वर उचलला नाही. बापूजींना तुरुंगात डांबण्यात आले. न्यायासाठी आपला लढा आहे याची बापूजींना खात्री होती. शेवटी सरकारला बापूजींपुढे हार खावी लागली. लोकांना मुक्तपणे मीठ बनविण्याची परवानगी देणे सरकारला भाग पडले.

निसर्ग हा मनुष्याचा उत्तम मित्र आहे, असे बापूजी मानीत. दररोज सकाळी ते फिरायला जात. हवा जेथे खेळती असेल अशा खोलीत ते झोपत. त्यांना फुले खूप आवडत पण ती कोणी झाडावरुन तोडली तर त्यांना पसंत नसे.

एके दिवशी रात्री बापूजी कापूस पिंजत होते. झोपण्यापूर्वी त्यांना काही पेळू तयार करुन ठेवायचे होते. धनुकलीच्या तातावर घासण्यासाठी त्यांना थोडी बाभळीची पाने हवी होती. कोणीतरी बाभळीच्या झाडाची एक मोठी फांदी तोडून त्यांच्यापुढे ठेवली. या वेळी फांदीवरची पाने अगदी गच्च मिटून जणु झोपी गेली होती. ते बापूजींच्या लक्षात आले. त्यांना वाईट वाटले. ते म्हणाले, "आपल्याप्रमाणेच झाडे सजीव असतात.

ती जगतात आणि श्वासोच्छवास करतात. त्यांनाही अन्न आणि पाणी लागते. आपल्याप्रमाणेच त्यांना झोपेची गरज असते. रात्री जेव्हा झाडे विश्रांती घेतात, त्यावेळी त्यांची पाने तोडून त्यांना मी दु:ख दिले, ही वाईट गोष्ट झाली. जेव्हा झाड आपली पाने मिटून झोपलेले असते तेव्हा त्याची पाने तोडून त्याला दु:ख देण्यात माझा अविवेक झाला. थोडा वेळ ते विचार करीत राहिले.

आवश्यक असल्या शिवाय कोणतीही वस्तू वाया घालवू नये असा बापूजींचा आग्रह असे. अगदी क्षुल्लक गोष्टीचे देखील त्यांना महत्व वाटत असे.


म. ग्रं. सं. पुणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. 92684 नों. दि ..............
वि. बाल वा ...... क्र. ..................




एकदा त्यांची पेन्सिल हरवली म्हणून ते शोधू लागले. त्यावेळी त्यांच्याजवळ एक मित्र बसला होता. त्याने आपली पेन्सिल बापूजींच्या पुढे केली, पण बापूजींनी ती नाकारली. आपली पेन्सिल शोधण्याचे काम त्यांनी चालूच ठेविले. इंचभर लांबीची ती त्यांची पेन्सिल जेव्हा त्यांना सापडली, तेव्हा त्यांना खूप आनंद झाला.

कोणतेही काम वेळेवरच झाले पाहिजे, असा बापूजींचा आग्रह असे. एकदा वाहन न मिळाल्यामुळे त्यांची थोडी पंचाईत झाली. त्यांना एका ठिकाणी ठरलेल्या वेळी पोहोचायचे होते. लगेच त्यांनी एकाची सायकल मागितली. दिलेल्या वेळेवर पोहोचण्यासाठी ते सायकल वर गेले.





एकदा बापूजींनी एका शाळेच्या वसतीगृहाला भेट दिली. ते त्यांना फारच गबाळ वाटले. खोल्यांच्या बाहेर जिथे तिथे सांडपाणी साचलेले दिसत होते. सर्वत्र डास आणि माशा बणबणत होत्या. ज्या सतरंज्यावर मुले झोपत होती, त्या खूप घाणेरड्या झाल्या होत्या. एका खोलीच्या मध्यभागी सतरंजीवर दऊत-टांक तसाच पडलेला दिसला. बिस्तंऱ्यांची कापडे फाटलेली आणि कळकटलेली दिसत होती. गाद्यांच्या खाली न धुतलेल्या चिंध्यांचा ढीग दडवून ठेविलेला होता. बापूजींना वाईट वाटले. ते म्हणाले, 'स्वच्छता, टापटीप व आरोग्याच्या सवयी लावण्यासाठी पैसा लागतो असे नाही. अशा घाणेरडेपणामुळेच रोगराई निर्माण होते'.



स्व. रवीन्द्रनाथ टागोर बापूजींची फार प्रशंसा करीत. ते म्हणत, जे मला अनेक वर्षात साधले नाही, ते गांधीजींनी काही दिवसांतच करुन दाखविले.

मला नेहमीच वाटे की, माझ्या शाळेतील मुलांनी स्वतःच आपापल्या खोल्या स्वच्छ ठेवाव्यात, आपले बिछाने घालावेत. स्वतःच जेवण तयार करुन आपली ताटे घासावीत. परंतु ह्या गोष्टी त्यांच्याकडून मला कधीच करवून घेण्याचे जमले नाही. याचे कारण असे होते की, मी माझी स्वतःची खोली कधीच झाडीत नसे. मा माझे अंथरुणाही स्वतः घालीत नसे, कधीच

स्वयंपाक करीत नसे, किंवा माझे ताटही घाशीत नसे.
माझ्या मुलांवर माझ्या सांगण्याचा काही प्रभाव पडत नसे. फक्त भाषणे देत असे आणि मुले ते ऐकून सोडून देत असत.

बापूजी शांतिनिकेतनात आले व त्यांनी लगेच मुलांना आपलेसे केले. त्यांच्यात ते मिसळत आणि एकरुप होऊन जात. अशी आपली कामे नोकराकरवी करुन घेणे हे बरोबर नाही असे ते मुलांना सांगत. ही कामे ज्यांची त्यांनी, स्वतःच केली पाहिजेत. बापूजी आपली खोली स्वतःच स्वच्छ करीत व स्वतः आपले अंथरुण घालून घेत. आपली भांडी धुवून टाकीत आणि आपले कपडे देखील स्वतः धूत. हे पाहून "मुलांना स्वतःची लाज वाटू लागली. सर्वच्या सर्व कामे नंतर ती स्वतःच मोठ्या आनंदाने करू लागली." असे होते आपले बापूजी.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ९२५७८ नों दि
वि. ०१.०१ क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम. ८६६०३ वि बा.वा.
क्रमांक ३६५८ नोंद दि. ३०/३/०७

IRBK-0112748

भारतीय मुद्रण

श्री. डी. डी. करकरिया यांनी लीडर्स प्रेस प्रायव्हेट लिमिटेड, १०८ शेठ मोतीशाह लेन, मुंबई-१० येथे छापिले व श्री. रणजीत बत्रा यांनी रत्नभारती, इलॅको हाऊस, सर फेरोजशाह मेहता मार्ग, मुंबई-१ बी आर् यांचे करिता प्रकाशित केले.